पातळीवर घेवून संबंधीत कार्यालय प्रमुखाच्या शिफारसीनुसार अशा प्रत्येक प्रकरणाचा निर्णय मध्यवर्ती कार्यालयातून घेतला जाईल.

३) समयवेतन श्रेणीत काम करणारे सर्व प्रवर्गातील कर्मचारी व रोजंदार गटातील १८० कर्तव्य बजाविलेले कर्मचारी या सवलतीचा लाभ घेण्यास पात्र असतील.

४) पिडीत कर्मचा-याने स्वत: खात्यामार्फत/घटक प्रमुखामार्फत अर्ज करणे आवश्यक राहील.

५) नैसर्गिक आपत्तीमुळे मालमत्तेचे नुकसान होवून निवाराहीन झाल्याचे राज्यशासन, विभागीय आयुक्त, जिल्हाधीकारी तहसीलदार किंवा ग्रामपंचायत किंवा नगर-पालीका प्रमुख यांचेकडून मिळविलेले प्रमाणपत्र कर्मचा-याला सादर करावे लागेल.

६) दिनांक ३०.९.९३ रोजी झालेल्या भूकंपामुळे कामावर गैरहजर राहिलेल्या कर्मचा-याने हे परिपत्रक प्रसारीत केल्याच्या तारखेपासून २ महिन्याच्या आत विशेष रजेसाठी अर्ज करणे आवश्यक राहिल. असे केलेले सर्व अर्ज एकत्रीतपणे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मंजूरीसाठी सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये या कार्यालयास ३१.७.९४ पूर्वी पाठवावेत.

७) भूकंपग्रस्त कर्मचा-यासाठी विशेष रजा मंजूर केल्यानंतर त्याने या कारणासाठी घटना घडलेल्या कालावधीत उपभोगलेली स्वत:च्या खात्यातील रजा त्याच्या रजेच्या पुस्त-कात जमा करण्यात यावी व त्याः रजा कालावधीची मर्यादा कुठल्याही परिस्थितीत ३० दिवसापेक्षा अधिक राहणार नाही. याची कटाक्षाने नोंद घ्यावी. अशी रजा दिल्याबद्दल संबंधीताच्या सेवा पुस्तकात व रजा पुस्तिका यामध्ये नोंद घेण्यात यावी.

८) अशी विशेष/खास रजा एकाच वेळी, उपभोगण्यास परवानगी देण्यात येईल. व नियमानुसार/करारानुसार मिळणा-या इतर रजेस जोडून घेण्यास परवानगी राहिल.

ही खास रजेची सवलत लातूर,उस्मानाबाद जिल्ह्यात दि. ३०.९.९३ रोजीच्या भूकंपामुळे ज्यांना झळ पोहचलेली आहे अशा कर्मचा-यांना व भविष्यात उद्भवणा-या नैसर्गीक आपत्तीत सापडणा-या महाराष्ट्रातील रा.प. सेवेत असलेल्या कर्मचा-यांना उपरोक्त निश्चित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन लागु राहील. ३० दिवसापर्यंत खास विशेष रजा (पगारी) मंजूर करण्याचे प्राधिकारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना महामंडळाने प्रदान केलेले आहेत. तसेच १८० दिवस पुर्ण न करु शकलेल्या प्रकरणी खास बाब म्हणून विशीष्ट शिथीलता देवून रजा मंजूर करण्याचे प्राधिकारही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील. संचालक मंडळाने शासन मान्यतेच्या

.. ३ ..